# मिरा भाईंदर महानगरपालिका

## उद्यान विभाग

दुसरा मजला, प्रभाग समिती क्र.4, कै. विलासराव देशमुख भवन,
जांगिड इन्क्लेव्ह, कनकिया, मिरारोड (पुर्व), ता.जि.ठाणे-४०१ १०७. दुरध्वनी क्र. २८१०३४०९

जा.क्र. मनपा/उदयान/मिरारोड/२०७२ /२०२३-२४ दिनांक : ०६ /०३ /२०२४

### // जाहीर नोटिस सुचना //

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन अधिनियमाच्या प्रकरण पाच कलम ८ (३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहिर करण्यात येते की, खालील नमुद तक्त्यातील झाडे काढणे करणेकामी प्रत्यक्ष पाहणी केली असता त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | वृक्षाचे नाव | अंदाजे उंची | संख्या | अदांजे वय | तपशील |
|---|---|---|---|---|---|
| **१) प्रविझा खान यांचे दि.०४/१२/२०२३ रोजीचे पत्र.** | | | | | |
| १ | स्पेथोडीया (मनपा रोड) | २० ते २५ | ०१ | १० वर्ष | सदरील झाडे एफ -९ ओल्ड गोल्डन नेस्ट,फेस -३,राम मंदीर जवळ,मिरा भाईदर रोड येथिल असून ०१ नग झाड बंगल्याच्या आवारात व ०१ नग झाड मनपा रोड वरील असून सुरक्षा भिंतीला लागून आहेत. ही झाडे मोठया प्रमाणात वाढलेली असून सदरील झाडांमुळे सुरक्षा भिंतीला तडा गेला आहे, त्यामुळे सुरक्षा भिंत पडण्याची शक्यता नाकरता येत नाही. तसेच झाडाची मुळे बंगल्याच्या आतमध्ये येऊन लादी /टाईल्स उखडून आल्या आहेत. त्यामुळे ०२ नग झाडे मुळासहित काढणे आवश्यक आहे. |
| २ | स्पेथोडीया (बंगल्याच्या आवारात ) | १५ ते २० | ०१ | ०७ वर्ष | |
| **२) सिद्धी गणेश को.ऑ.हौ.सो.लि. यांचे दि.२२/०२/२०२४ रोजीचे पत्र.** | | | | | |
| १ | नारळ | २५ ते ३० फुट | ०१ | १० वर्ष | सदरचे झाड सिद्धी गणेश को.ऑ.हौ.सो.लि.प्लॉट नं १४०,हिस्सा नं १,व्हिलेज मिरा,रॉयल गार्डन बिल्डींग,एम.आय.डी.सी.रोड,मिरारोड (पु.) येथिल सोसायटीच्या मध्येच सुरक्षारक्षक भिंतीच्या व सोसायटीच्या मध्येच रस्त्यावर आहे. भविष्यात काहि आपतकालीन घटना घटल्यास सोसायटी मध्ये अग्निशमन विभागाची गाडी आत मध्ये जावू शकत नाही. सदर झाड वाकलेले असून जोराच्या वाऱ्याने पडून जिवित व वित्तहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे झाड मुळासहित काढणे आवश्यक आहे. |
| **३) कस्तुरी वंदना कॉम्प्लेक्स ए.बी.सी.डी. विंग यांचे दि.१३/०२/२०२४ रोजीचे पत्र.** | | | | | |
| १ | क्रिस्टल पाम | २० ते २५ फुट | ०१ | १० वर्ष | सदरचे झाड कस्तुरी वंदना कॉम्प्लेक्स ए.बी.सी.डी. विंग, जुना सर्वे नं ५६,५७,७१ नविन सर्वे नं १३,१०३,१०४ हिस्सा नं ८,२,३,५,६,७ए,७बी, गोडदेव गाव, भाईंदर(पु.) येथिल सोसायटीच्या आवारात असुन मोठ्या प्रमाणात वाढलेले आहे. झाडामुळे संरक्षण भिंतीला तडा गेला आहे. तसेच झाडाची मुळे जवळच असलेल्या पाण्याच्या टाकी मध्ये गेल्यामुळे अडथळा निर्माण होत आहे. तरी सदरील संरक्षण भिंत पडुन जिवित व वित्तहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे झाड मुळासहित काढणे आवश्यक आहे. |

| अ.क्र | वृक्षाचे नाव | अंदाजे उंची | संख्या | अदांजे वय | तपशील |
|---|---|---|---|---|---|
| ४) गौरव विनस ई आणि एफ को.ऑ.हौ.सो.ली. यांचे दि.२१/०२/२०२४ रोजीचे पत्र | | | | | |
| १ | गुलमोहर | २० ते २५ फुट | ०१ | १० वर्ष | सदरची झाडे गौरव विनस ई आणि एफ को.ऑ.हौ.सो.ली. फेस II प्रेम नगर जवळ,मिरारोड (पु.) येथिल सोसायटीच्या आवारात सुरक्षा रक्षक भिंती जवळ असुन भिंती वर झुकलेली आहे. भिंतीला तडे जावुन भिंत खराब झालेली आहे. जोराच्या वाऱ्याने भिंत पडुन जिवित व वित्तहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे झाडे मुळासहित काढणे आवश्यक आहे. |
| २ | पेल्ट्रोफॉर्म | २५ ते ३० फुट | ०१ | १० वर्ष | |
| ३ | नारळ | ३० ते ३५ फुट | ०१ | १० वर्ष | |

सदर प्रस्तावित वृक्ष तोडण्याची /स्थलातंरीत करण्याची परवानगी देण्याचा इरादा आहे. याबाबत नागरिंकाच्या काही हरकती तसेच सदर वृक्षांवर पक्षांची घरटी असल्यास जाहिर सुचना प्रसिद्ध झाल्यापासुन ७ दिवसाच्या आत लेखी स्वरुपात उप-आयुक्त (उद्यान विभाग), मुख्य कार्यालय, भाईंदर (प.) येथे किंवा garden@mbmc.gov.in किंवा mbmc.garden@gmail.com या ई-मेल आयडी वर कळविण्यात यावे. तसेच मुदतीनंतर प्राप्त होणा-या हरकती/सुचनांचा विचार केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

5.3.2024

(कांचन गायकवाड)
सहाय्यक आयुक्त तथा
वृक्ष अधिकारी
मिरा भाईंदर महानगरपालिका